AIOC - MEDIA COVERAGE - 13 - 01-2020

शास्त्रार्थ परिषदेत रंगली शास्त्र चर्चा

लोकशाही वार्ता / नागपूर

रामटेकच्या कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या वतीने अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषद आयोजित करण्यात आली आहे. या अंतर्गत दुसरी शास्त्रार्थ परिषद शनिवारी पार पडली. अध्यक्षस्थानी प्रा. मणी द्राविड शास्त्री होते, तर निरिक्षक म्हणून प्रा. कोरडा सुब्रमणियम उपस्थित होते.

द्वैत वेदांत या विषयावर डॉ. नारायण यांनी 'वेदाभ्यास' या विषयावर प्रा. वीरनारायण पांडुरंगी, साहित्य या विषयावर प्रा. कोम्पेला सूर्यनारायण यांनी विचार मांडले.

प्रा. रंगा रामानुजाचार्य यांनी विशिष्टाद्वैत, मीमांसा या विषयावर पं. महेश्वरम यांनी विचार व्यक्त केले. प्राचीन न्याय या विषयावर डॉ. चंद्रशेखर जोशी आणि व्याकरण या विषयावर श्रुती के. एस. यांनी अभ्यासपूर्ण विचार व्यक्त केले. काही मुद्यांवर शास्त्र चर्चा चांगलीच रंगली. आपल्या अध्यक्षीय भाषणात मणीद्रविड शास्त्री यांनी सर्वच सहभागी वक्त्यांचे अभिनंदन केले. मर्यादीत वेळेत संपूर्ण विषय सांगणे कठीण असले तरी वक्त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केले असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच दोन पुस्तकांचे प्रकाशनही यावेळी करण्यात आले. सिस्फा चित्रकला महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शास्त्रार्थ करताना तज्ज्ञांची रेखाचित्रे काढून त्यांना भेट दिली. शास्त्रार्थ परिषदेचे संचालन प्रा. शिवराम भट यांनी केले.

भारतीय संस्कृतीचा मूलाधार प्राच्यविद्याच

● डॉ. विजय भटकर यांचे प्रतिपादन ● अ. भा. प्राच्यविद्या परिषदेचा थाटात समारोप

◆ नागपूर, १२ जानेवारी

भारतीय संस्कृती अतिप्राचीन आणि शाश्वत आहे. त्यामुळेच ती विविध आक्रमणे होऊन देखील चिरंतन टिकून राहिली. याचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संस्कृतीचा मूलाधार प्राच्यविद्याच आहे, असे ठाम प्रतिपादन पद्मविभूषण डॉ. विजय भटकर यांनी केले.

संस्कृत विद्यापीठाच्या यजमानत्वाखाली तीन दिवसांपासून नागपुरात सुरू असलेल्या अ. भा. प्राच्यविद्या परिषदेचा समारोप रविवारी डॉ. विजय भटकर यांच्या उपस्थितीत पार पडला. याप्रसंगी सत्यव्रत शास्त्री, आर. सी. सिन्हा, सुखदेव शर्मा, हरिदत्त शर्मा, परिषदेचे अध्यक्ष गौतम पटेल, महासचिव सरोजा भाटे, कुलगुरू श्रीनिवास वरखेडी, स्थानिक सचिव मधुसूदन पेन्ना, कुलसचिव सी. जी. विजयकुमार, चंद्रकात शुक्ल आणि राधावल्लभ त्रिपाठी आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना डॉ. विजय भटकर यांनी, आजवर मी अनेक परिषदांमध्ये सहभागी झालो पण आज मला याठिकाणी निराळी अनुभूती होत आहे. सध्या पौर्वात्य आणि पाश्चिमात्य अशा दोन सभ्यता अस्तित्वात आहेत. त्यांचा अनेकांनी अभ्यास केला पण चिरंतन टिकली ती भारतीय सभ्यता. त्याचे मूळ कारण वसुधैव कुटुंबकम हा भाव आहे. भारतीय सभ्यतेने अनेक आक्रमणांचा सामना केला, पण ती नामशेष होऊ शकली नाही. त्यात शाश्वत सातत्य आणि नित्यनूतनता हा भाव असल्याचे ते द्योतक आहे. मुख्य म्हणजे भारतीय संस्कृतीचा मूळ गाभा संस्कृत भाषा आहे आणि वेद, उपनिषदे, पुराण हे सर्व संस्कृतमध्ये आहे. येत्या काळात जगातील भाषांचा अभ्यास करून त्यात संस्कृतचे किती शब्द कोणत्या जागतिक भाषेत अंतर्भूत आहेत याचा अभ्यास होण्याची गरज आहे. त्यातून तक्षात येईल की जगातील सर्व भाषांचा मूळ स्रोत संस्कृत आहे. आगामी काळात संगणक शास्त्रांना देखील संस्कृत भाषेचे ज्ञान प्राप्त करावे लागेल, कारण त्याशिवाय या क्षेत्रात टिकाव धरणे कठीण होईल. आपल्या संस्कृतीत अहं ब्रह्मास्मि असे म्हटले आहे. त्यामुळे संस्कृत आणि प्राच्यविद्येतच स्वतःला ओळखण्याचे शिक्षण दिले जाते. आगामी काळ हा प्राच्यविद्येचाच असणार आहे. यात महिलांचा सहभाग आगामी काळात अधिक असेल आणि मानवतेचे भविष्य यातूनच ठरणार असल्याचेही डॉ. विजय भटकर यांनी सांगितले.

स्वागतगीताने समारोप सत्राचा प्रारंभ झाला. मुंबई विद्यापीठाच्या पाली विभागातर्फे पाली भाषेत प्रार्थना सादर केली. याप्रसंगी मधुसूदन पेन्ना यांनी प्रेझेंटेशनच्या माध्यमातून परिषदेचा अहवाल सादर केला. कार्यक्रमाच्या शेवटी सरोजा भाटे यांनी शोधप्रबंध स्पर्धेतील उत्कृष्ट प्रबंध सादर करणाऱ्या संशोधकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुरेख संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. रेणुका बोकारे यांनी केले.

◀ (तभा वृत्तसेवा)

तरुण भारत

कविकुलगुरु-कालिदास-संस्कृत-विश्वविद्यालयः
100th Year * 50th Session
NAGPUR Session * 10-12 Jan. 2020
Kavikulaguru Kalidas Sanskrit University

मार्गदर्शन करताना डॉ. विजय भटकर. व्यासपीठावर सत्यव्रत शास्त्री, आर. सी. सिन्हा, सुखदेव शर्मा, गौतम पटेल, श्रीनिवास वरखेडी, मधुसूदन पेन्ना, सी. जी. विजयकुमार व अन्य मान्यवर

उत्कृष्ट शोधनिबंधकांचा सत्कार

या परिषदेत एकूण १०२ शोधनिबंध सादर करण्यात आले. परिषदेच्या समारोपप्रसंगी त्यातील उत्कृष्ट शोधनिबंधकांचा सत्कार करण्यात आला. त्यात डॉ. नियापाणी मिश्रा, डॉ. करुणा आर्य, रेखा कुमारी, ब्रजेश पंडित, रितेषा, पंकज पवार, के. वरलक्ष्मी, सुनीता वर्मन, डॉ. क्षिप्रा रे, प्रत्युषा घोष, शोभा कुमारी, महेंद्र राठोड, कु. शिवा, मंजूबाला, यदुपती आचार्य, रहन पाटील, श्यामसुंदर शर्मा, सत्यप्रकाश शर्मा, अर्जित गुप्ता, डॉ. मधु सत्यदेव, रेखा सिंग डॉ. मृदुला काळे, डॉ. वेदप्रकाश मिश्रा तर विशेष गटात डॉ. ओंकार जोशी, कु. श्रुती त्याच्याप्रमाणे सारस्वत दिंडीतील सहभागाबद्दल श्री आयुर्वेद महाविद्यालय प्रथम, केशवनगर विद्यालय द्वितीय, तर मुंडले इंग्लिश मीडियम शाळेला तृतीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पुरस्कार आणि सत्कार

या कार्यक्रमात सत्यव्रत शास्त्री यांना प्राच्यविद्या भास्कर, गौतम पटेल यांना सनातन विद्याभास्कर पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. उत्कृष्ट आयोजनाबद्दल कुलगुरू श्रीनिवास वरखेडी, मधुसूदन पेन्ना यांचा सत्कार करण्यात आला. या आयोजनाबद्दल राधा मेहता पुणे, रिता भट्टाचार्य आणि डॉ. कोकिळा यांनी आपल्या मनोगतातून प्रशंसा केली.

● डॉ. विजय भटकर यांचे प्रतिपादन ● अ. भा. प्राच्यविद्या परिषदेचा थाटात समारोप
भारतीय संस्कृतीचा मूलाधार प्राच्यविद्याच

The Hitavada

Kavi Sammelan gets huge response

Poets releasing a book during Kavi Sammelan at AIOC.

A 'KAVI Sammelan' organised on the occasion of the All India Oriental Conference 2020 organised by Kavikulguru Kalidas Sanskrit University evoked good response. The poets took the Oriental Conference to a new height by presenting poems with quality content. Prof Ramakant Shukla inaugurated the sammelan. Prof. Srinivas Varkhedi, Vice-Chancellor, Kavikulguru Kalidas Sanskrit University, along with other office bearers were prominently present.

On the occasion Prof. Rajendra Mishra was chief guest. Prof. Ramakant Shukla and Prof. Gopabandhu Mishra were specially present.

Presenting the poem on the Vice-Chancellor of the University, Dr. Leena Rastogi contributed fabulously. In addition, Prof. Hardant Sharma,

Prof. Devishai Pandey, Prof. Harshadev Madhav, Prof. Madhusudan Penna, Prof. Nanda Puri, Dr Lina Rastogi, Shruti Kanitkar, Radhavallabh Tripathi, Yuvraj Bhattarai and Tripathi participated in the poetry extravaganza.

A wide range of topics including femininity, Pollution on earth, poet Kalidas and his compositions, Bharatmata were covered by the poets in their rendition.

The programme was compered by Saurabh Dwivedi.

AIOC - MEDIA COVERAGE - 13 - 01-2020
अखिलभारतीयप्राच्यविद्यासम्मेलनम्
All India Oriental Conference